संतांचे तत्त्वज्ञान

संपादक -

प्रा.डॉ. सुनिलदत्त गवरे



संत ज्ञानेश्वर
संत बसवेश्वर
संत सावता
संत जनाबाई
संत नामदेव
संत मुक्ताबाई
संत कबीर
संत एकनाथ
संत रामदास स्वामी
संत तुकाराम
संत बहिणाबाई
संत गाडगेबाबा
संत गुलाब महाराज
संत तुकडोजी

अथर्व पब्लिकेशन्स

संतांचे तत्त्वज्ञान

© सुरक्षित

ISBN : 978-93-94269-19-4
पुस्तक प्रकाशन क्र. ९३४

प्रकाशक व मुद्रक
युवराज भटू माळी

अथर्व पब्लिकेशन्स
धुळे : १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे- ४२४ ००१.
संपर्क : ९४०५२०६२३०
जळगाव : शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,
तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव- ४२५ ००१.
संपर्क : ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
ई-मेल : atharvapublications@gmail.com
वेबसाइट : www.atharvapublications.com

प्रथम आवृत्ती : जून २०२०
द्वितीय आवृत्ती : २२ जून २०२२
अक्षरजुळवणी : अथर्व पब्लिकेशन्स
मूल्य : २९५/-

E-Book *available on*
amazon.in ▪ GooglePlayBooks ▪ atharvapublications.com

ऑनलाइन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

११. संत बहेणाबाई (१६२८) ११३
डॉ. स्वाती भोंगळे
१२. संत निळोबा (१६६८) १२२
प्रा. गणेश निमसे
१३. संत गाडगेबाबा (१८७६) १३५
डॉ. वेदप्रकाश डोणगावकर
१४. संत गुलाबराव महाराज (१८८१) १४६
डॉ. सुनिलदत्त गवरे
१५. संत तुकडोजी (१९०९) १६३
प्रा. रजनी काळे

संत गाडगेबाबा

- डॉ. वेदप्रकाश डोणगावकर

संत गाडगेबाबा यांचे तत्त्वज्ञान हे प्रामुख्याने मानवतावादी तत्त्वज्ञान होते. मानवाला अज्ञानाच्या दरीतून काढून त्याचा विकास करणे, त्याला विकासाचा मार्ग दाखविणे, त्याच्या विकासातील अडथळे दूर करणे, हे बाबांच्या जीवनाचे ध्येय बनलेले होते. बाबांचा हा मानवतावाद सामान्य मानवतावादाच्या तुलनेत अत्यंत व्यापक होता. कारण, "सामान्य मानवतावादाच्या दृष्टिकोनातून जात, धर्म, वर्ण, वंश, लिंग यापैकी कोणत्याही प्रकारच्या विषमतेला महत्त्व देता येत नाही. मानवाला फक्त मानव म्हणून पाहिले पाहिजे. मानवाचा विकास साधत असताना तर्काच्या तुलनेत भावभावनांना महत्त्व दिले पाहिजे. मानवाच्या बाह्य विकासापेक्षा आंतरिक विकास महत्त्वाचा असतो." सामान्य मानवतावादातली ही सर्व लक्षणे संत गाडगेबाबांच्या जीवनकार्यातून नित्याने पाहावयास मिळतात; पण याशिवाय, बाबांच्या कार्यातून दिसून येणारी विशेष बाब अशी की, बाबा केवळ मानव नव्हे; तर मानवी जीवनाशी संबंधित असलेल्या सबंध प्राणिमात्रा-भुतांचे रक्षण करून त्यांचे कल्याण साधण्याला महत्त्व देत असत.

मानवी कल्याणाच्या दृष्टिकोनातून बाबांनी जे काही विचार मांडले किंवा जे काही कार्य केले, ते अमर्याद आहेत. अशा या विचार व कार्याच्या आधारे तत्त्वज्ञानातीलच नव्हे, तर विविध ज्ञानशाखांतील वेगवेगळ्या संकल्पना विकसित होऊ शकतात. प्रस्तुत प्रकरणामध्ये तत्त्वज्ञानातील 'सत्ता-ज्ञान-नीती' या तीन विभागाशी संत गाडगेबाबांच्या विचार व कार्याचा कसा संबंध आहे, हे पाहता येईल.

संत गाडगेबाबा यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील सेनगाव येथे झाला. त्यांचे खरे नाव डेबूजी झिंग्रजी जानोरकर असे होते. त्यांच्या बालपणीच सतत दारू प्याल्याने त्यांचे वडील मरण पावतात. वडिलांच्या मृत्यूनंतर डेबूजी आपल्या मामाच्या गावी दापुरा येथे जातो. मामा कर्जापायी आपली जमीन सावकाराकडे ठेवतो; पण मामाच्या अज्ञानाचा फायदा उचलित सावकार मामाची जमीन लांबविण्याचा प्रयत्न करतो. मात्र, डेबूजी

आपल्या हिमतीवर मामाची जमीन सावकाराच्या कचाट्यातून सोडवून आणतो. त्याच दरम्यान इ. स. १८९२ मध्ये डेबूजीचा विवाह कुंथाबाई हिच्याशी होतो. वैवाहिक जीवन जगत असताना डेबूजी दारू, कर्ज, अज्ञान यांमुळे आपल्यावर जी परिस्थिती आली, तशा प्रकारची परिस्थिती इतरांच्या जीवनात निर्माण होऊ नये याविषयीच्या चिंतेने व्याकूळ होतो. परिणामी इ. स. १९०५ मध्ये समाजाच्या उद्धारासाठी डेबूजी गृहत्याग करतो आणि खऱ्या अर्थाने तिथूनच तो डेबूजीचा गाडगेबाबा होतो.

संत गाडगेबाबाची संपत्ती म्हणजे एक फुटके गाडगे आणि एक खराटा. बाबा कोणाच्याही घरचे काहीतरी काम करून द्यायचे आणि त्याच्या बदल्यातच काहीतरी मागून खायचे. म्हणजेच बाबांनी कधीच कोणाकडून फुकटचे खाल्लेले नव्हते. पंढरपूर येथे येणाऱ्या भाविकांना आसरा लाभावा म्हणून बाबांनी १९२० ते १९२५ पर्यंत अर्थसहाय्यातून तीन धर्मशाळा बांधल्या. याशिवाय मुंबईच्या जे. जे. हॉस्पिटलमध्ये लांबवरून येणाऱ्या लोकांसाठी त्याच परिसरात १९५० मध्येही धर्मशाळा बांधली. बाबांच्या या कार्याचे वैशिष्ट्य असे की, त्यांनी उभारलेल्या या धर्मशाळांमध्ये ते स्वत: किंवा त्यांचे कुटुंबीय मात्र एका रात्रीसाठीही थांबले नव्हते. निश्चितच बाबांचे हे कार्य निष्काम स्वरूपाचे होते.

अशा या निष्काम वृत्तीच्या, व्यापक मानवतावादी, कर्मयोगी महामानवाचा २० डिसेंबर १९५६ रोजी अमरावती जिल्ह्यातील वलगाव येथे पेढी नदीच्या तीरावर मृत्यू झाला. बाबा अशिक्षित होते. त्यांनी काहीही लिखाण केले नाही; पण कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी जे विचार व्यक्त केले आहेत, त्याचे काही प्रमाणात प्रत्यक्ष संकलन प्रबोधनकार ठाकरे यांनी केले होते. याशिवाय, त्यांच्या विचारावर आधारित इतरही काही पुस्तके आज उपलब्ध होतात. याशिवाय, बाबांनी ८ नोव्हेंबर १९५६ रोजी मुंबई या ठिकाणी आपल्या आयुष्याचे जे शेवटचे कीर्तन केले होते, त्याची ध्वनिफीत इंटरनेटवर उपलब्ध आहे.

बाबांची पद्धत –

बाबा कीर्तनकार होते. कीर्तनाच्या माध्यमातून ते प्रचलित रूढी-परंपरांवर घाला घालायचे. इ. स. पूर्व ग्रीक देशात जिनोफेनिस सुद्धा पोवड्याच्या माध्यमातून प्रचलित रूढींवर टीका करायचा. बाबा कीर्तनासाठी आलेल्या लोकांशी संवाद साधायचे, ते त्यांना प्रश्न विचारून त्यांनाच त्याचे उत्तर देण्यास भाग पाडायचे. बाबांची ही पद्धत निश्चितच ग्रीक तत्त्वज्ञ झिनो आणि सॉक्रेटिसची आठवण करून देणारी आहे. झिनो आणि सॉक्रेटिसही समोरच्याला प्रश्न विचारत, मिळालेल्या उत्तरातून पुन्हा प्रश्न आणि शेवटी मूळ उत्तरापर्यंत ते न्यायचे. म्हणून बाबांच्या या पद्धतीला ही जर द्वंद्वात्मक, संवादात्मक अशी नावे दिली तरी वावगे ठरणार नाही.

सत्ताशास्त्रीय विचार –

प्रामुख्याने सत्ताशास्त्रीय विचारांमध्ये विश्वाच्या व्युत्पत्तीविषयी आणि विश्वातील मूलतत्त्वाविषयी विचार केला जातो. बाबांनाही विश्वाच्या व्युत्पत्तीविषयी प्रश्न पडायचा. ते म्हणायचे, हे सूर्य, चंद्र, तारे कोणी? कधी? आणि कसे बनविले असतील? अशा या प्रश्नांसदर्भात सामान्यत: आपण 'ईश्वर' असेच उत्तर देतो; पण बाबा म्हणतात, 'कोणीतरी काहीतरी जुळवून सांगतात आणि लोक माना डोलावतात. ज्याला हे कळले तो माणूस जिंकला.' अर्थात, बाबा विश्वाच्या व्युत्पत्तीविषयी आज्ञेयवादाचा पुरस्कार करताना दिसतात. कारण, एका ठिकाणी ते म्हणतात, ''देव दिसणार कसा? तो कसा आहे, हेच मुळी आजवर कुणाला उमगले नाही. मोठमोठे ऋषिमुनी होऊन गेले. आम्हाला हे देवाचे गूढ समजले नाही हो नाही.'' पण असे असले, तरीही बाबा ईश्वराला मानणारे होते, असेच अनेकदा वाटू लागते. कारण, गृहत्याग केल्यानंतर एकदा ऋणमोचनला बाबांना त्यांचा परिवार येऊन भेटतो. तेव्हा बाबांची आई सखूबाई त्यांना म्हणते, 'तू निघाला, पण आम्हाले कोण आहे?' त्यावर बाबा 'तुम्हाले देव आहे', असे उत्तर देतात.

यावरून बाबा हे ईश्वराचे अस्तित्व स्वीकारणारे होते, असे वाटते. याशिवाय, बाबा एका कीर्तनात, 'पृथ्वी निर्माण करणारा, आपल्यासाठी अन्नधान्य व सर्व सुखसोयी निर्माण करणारा परमेश्वर एक आहे की दोन?' असा प्रश्न उपस्थितांना करतात. यावरूनही बाबा ईश्वराचे अस्तित्व स्वीकारणारे होते, हे दिसून येते. तेव्हा या ठिकाणी काही प्रश्न उपस्थित होतात की, बाबांचा तो देव अर्थात ईश्वर कसा आहे? म्हणजे तो सगुण आहे की निर्गुण? त्याच्या भक्तीचे साधन काय? त्याच्या ज्ञानासाठी साधन काय? या सर्व प्रश्नांच्या अनुषंगाने बाबांच्या देवाविषयीच्या विचारांचा अभ्यास केला असता, असे म्हणता येईल की, बाबांचा देव हा सगुण आणि निर्गुण दोन्ही रूपांत आहे.

सामान्यत: देवाला सगुण मानले की, त्याला मूर्तिरूपातच पाहिले जाते; पण बाबांना सगुणत्वाचा हा अर्थ मान्य नव्हता. अर्थात, बाबा मूर्तिपूजक नव्हते, ते मूर्तिपूजाविरोधक होते. ते म्हणतात, 'दगड-धोंड्यांना नुसता शेंदूर फासून जर त्याचा देव होत असेल आणि तो नवसालाही पावत असेल, मग एक चांगला मोठा डोंगर पाहून सपाटेबाज शेंदूर फासून त्याचा टप्पोरेबाज भलामोठा देव बनविता येईल आणि तो आपले मोठमोठाले नवसपण फडशा पाडत जाईल.' एकंदर बाबांना दगड-धोंड्यांचा देव तर मुळीच मान्य नव्हता. याशिवाय, त्यांना देवाला नवस बोलणे इत्यादी प्रकारही अमान्य होते. इतकेच नव्हे; तर देवाच्या नावाने यज्ञ, होम, हवन, उपवास, तप, बळी, यात्र, उत्सव यांसारख्या प्रथाही

त्यांना निरर्थक वाटायच्या. त्यांच्या दृष्टिकोनातून या सर्व प्रकारांमुळे लोकांचा वेळ आणि पैसा वाया जातो. अशा या लोकांना उद्देशून बाबा संत कबिरांच्या दोह्यातील या ओळी म्हणायचे,

जत्रा मे फत्रा बीटाया, तीरत बनाया पाणी ।
दुनिया भई दिवाणी, पैसे की धुलदानी ।

बाबांचा देव हा मनुष्यामध्ये आहे. याच अनुषंगाने ते एकदा त्यांच्या आईला म्हणतात, 'स्वत: पुरते सगळेच पाहतात; पण उर्वरित आयुष्य गरजवंतांच्या सेवेत घालविले तर तीच खरी देवाची सेवा होय.' अर्थात, 'मनुष्य' हेच बाबांचे सगुण ईश्वर होय आणि अशा या देवाची सेवा करणे, हेच त्या निर्गुण ईश्वराची सेवा होय.

बाबांची ईश्वरभक्ती ही उपयुक्ततावादासारखी होती. ईश्वराला प्रसन्न करण्यासाठी चाललेल्या बळीप्रथेला तर ते विरोध करायचेच; पण त्याऐवजी ते दुसरा उपायही सुचवायचे. तो उपाय म्हणजे 'सात्त्विक अन्नदान' होय. आज आपण पाहत आहोत की, आपल्या समाजामध्ये रोज कित्येक लोक भूकमारीने मरत आहेत. अशा या भूकमारीवर उपाय करण्याच्या उद्देशाने बाबा देवाच्या नावाने परमार्थ घडवून आणण्याचा सल्ला देतात. बाबांच्या दृष्टिकोनातून सांगावयाचे झाल्यास, 'आपण सर्वजन जेवून, खावून सुखी आहोत; पण आपल्या सभोवताली असे काही अपंग, रोगी, भिकारी लोक आहेत की, त्यांना पोटभर खायलाही मिळत नाही. अशा या लोकांनाही देवाच्या नावाने केल्या जाणाऱ्या जेवणासाठी बोलावले पाहिजे आणि जर असे केले तर तेच खऱ्या अर्थाने देवाला नैवेद्य दाखविल्यासारखे होईल.'

निश्चितच बाबांच्या अशा या भूमिकेनुसार देवाच्या नावाने अन्नदान करण्याचा आणि त्यानिमित्ताने इतरांची सेवा करून त्यात स्वत:ला सुख मिळविण्याचा प्रकार म्हणजे 'उपयुक्ततावादा'चाच पुरस्कार करणारा ठरतो. व्यावहारिकदृष्ट्या सांगावयाचे झाल्यास, ईश्वराला अभिप्रेत कार्य मानवाने करणे हीच ईश्वरभक्ती आहे, असे बाबांना वाटत असे. अशा या भक्ताला ते सत्पुरुष म्हणायचे. बाबांच्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास, 'ज्या धन्याच्या अंत:करणात दया असेल, तो सत्पुरुष होय!'

बाबांनी लोकसंग्रहातून जेव्हा नदीवर घाट बांधले, धर्मशाळा उभारल्या, तेव्हा तेव्हा त्यांना अशा अनेक सत्पुरुषांचा सहवास लाभला. परिणामी त्यांना सर्वत्र असे हे सत्पुरुषच दिसायला लागतात; किंबहुना अशा सत्पुरुषांच्या रूपाने त्यांना ईश्वरच सर्वत्र भरभरून असल्याचे वाटू लागतो. प्रबोधनकार ठाकरे लिहितात, त्याप्रमाणे एकदा आषाढी एकादशीच्या प्रसंगी एका माणसाने बाबांना, 'बाबा, देवदर्शन घेऊन आलात का देवळातून?' असा प्रश्न विचारला. त्यावर

बाबांनी उत्तर दिले की, ''हा समोर जागता, बोलता, नाचता विठ्ठल दिसत असता, देवळात जायचेच कशाला? देव काय देवळात बसलाय वाटतं? जिकडे नजर टाकावी तिकडं तो अपरंपार भरलेला आहे.''

एकंदर बाबांच्या या विचारातून हे दिसून येते की, ईश्वराचे ज्ञान हे प्रत्यक्षाने इंद्रियांनी होत नाही, तर ते प्रत्यक्षाच्या आधारेच, पण 'अनुभूती'ने होत असते. अर्थात, सामान्यांच्या रूपात ईश्वराचे ज्ञान होत असते. या ठिकाणी दुसरा एक विषय लक्षात घेण्यासारखा असा ही आहे की, ईश्वर ही जरी मूळसत्ता असली तरीही या विश्वात मानवाचे ही अस्तित्व आहे. अशा या मानवाला सत्मार्गाने चालवून त्यांचा उत्कर्ष करणे, हा विचारही यात अंतर्भुत आहे. म्हणून बाबांचे हे सत्ताशास्त्रीय विचार 'अस्तित्ववाद' या विचारसरणीशी मेळ खाणारे आहेत, असेही आपल्याला म्हणता येईल.

ज्ञान-शिक्षणविषयक विचार -

सामान्यत: आपण पाहतो की, तत्त्वज्ञानात तत्त्वाच्या ज्ञानासंदर्भाने ज्ञानविषयक चर्चा झालेली आहे. त्यात प्रमाण इत्यादीचे महत्त्व आहे; पण बाबांनी त्यासंदर्भाने ज्ञानाची चर्चा केलेली नव्हती. बाबांनी ज्ञानाचे महत्त्व जाणून त्यासाठी शिक्षणाचा आग्रह धरला होता. त्यांचे शिक्षणविषयक सबंध विचार हे अनुभवावर आधारित आहेत. अर्थात, त्यांची ज्ञानविषयक भूमिका ही अनुभववादी आहे. कारण, बाबांचे विचार व कार्य हे सामान्य, उपेक्षित, दुर्लक्षित घटकांसंबंधीचे होते. अशा या घटकाला स्वावलंबी बनविणे, त्यांना आपल्या अस्तित्वाची ओळख करून देणे, हेच खऱ्या अर्थाने बाबांसमोरचे आव्हान होते. म्हणूनच ते एका ठिकाणी म्हणतात, 'तुम्ही निरक्षर राहिलात ते बस्स झाले; पण आता आपल्या मुलामुलींना शिक्षण देऊन हुशार करा. गावात शाळा काढा.'

वास्तविक पाहता बाबा स्वत: शिक्षित नव्हते; पण शिक्षणाचे महत्त्व त्यांना माहीत होते. निरक्षरता ही मानवाला डबघाईस नेऊ शकते, हे त्यांनी आपल्या मामाच्या रूपाने बालपणीच जाणले होते. म्हणून त्यांची भूमिका होती की, 'आपण सर्वांनी आपापल्या मुलांना शिक्षण दिले पाहिजे. जर आपल्याकडे पैसे नसतील तर आपण जेवणाचे ताट मोडले पाहिजे. पत्नीसाठी कपडेलत्ते, पाहुण्यांचा पाहुणचार इत्यादींतून होणारा अनावश्यक खर्च टाळला पाहिजे आणि त्या पैशाने मुलांना शिक्षण दिले पाहिजे.' निश्चितच बाबांची ही शिक्षणविषयीची आस्था पाहून मानवी कल्याणासाठी शिक्षण हे किती महत्त्वाचे आहे, हे या ठिकाणी लक्षात घेतले पाहिजे. शिक्षणाअभावी मानवाची काय गत होते सांगत ते म्हणतात, 'शिक्षणाशिवाय माणूस धोंडा!'

''संतुष्ट डुकरापेक्षा असंतुष्ट सॉक्रेटिस बरा!' तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात हे वाक्य

प्रसिद्ध आहे. या वाक्यातील 'असंतुष्ट' हा शब्द ज्ञानाच्या संदर्भात वापरला जातो; पण ज्ञान शिक्षणाशिवाय कसे प्राप्त होईल? शिक्षण नसेल तर आपल्या जीवनाला काही अर्थ आहे काय? अर्थातच, यासंदर्भात बाबांचे उत्तर 'नाही' असेच होते. याही पुढे जाऊन बाबा अशा या अशिक्षित लोकांना जनावराची उपमा देतात. बाबा म्हणतात, 'रोगावर शिक्षण हा एकमेव रामबाण उपाय आहे. अशिक्षित माणसांत व जनावरांत काही फरक नाही. अशिक्षित, अज्ञानी, माणसाला सावकार बुडवितो, सरकारी नोकर दरडावतो, लबाड लोक बडवितात. तुम्हाला स्वाभिमानाने जीवन जगावयाचे असेल, तर माझ्या मायबापांनो, शिक्षण घ्या. लहान असा, मोठे असा, स्त्री-पुरुष असा; पण शिक्षण घेतल्याशिवाय राहू नका.' एकंदर बाबांच्या मतानुसार, अशिक्षितपणा हा मानवाच्या विकासातला सर्वांत मोठा अडथळा आहे; किंबहुना अशिक्षितपणामुळेच मानवी जीवनात दारिद्र्य आहे.

सामान्यात: आपण असे मानतो की, धार्मिक, पोथी-पुराणात सांगितल्यानुसार, कर्म केल्याने पुण्य प्राप्त होते; पण बाबा अशा या धारणेचा विरोध करतात. ते म्हणतात, 'मायबापहो! तुम्हाला काम तरी मिळाले; पण तुमच्या मुलाबाळांच्या नशिबी तेही येणार नाही. शिक्षण हे मोठं पुण्याईचं काम आहे. आपण शिका व इतरांनाही शिकवा.' एकंदर 'शिक्षण ही कला आहे' आणि अशी ही कला अवगत असणारी व्यक्ती कधीही बेरोजगार असणार नाही. तो प्राप्त शिक्षणाच्या आधारे आपला व आपल्या कुटुंबाचा कुठल्या ना कुठल्या रूपाने उदरनिर्वाह करण्यासाठी समर्थ बनतो, हाच संदेश बाबांच्या या विधानातून ध्वनीत होतो.

बाबांच्या काळाचा विचार केला असता, समाजातला मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित होता. तो पोथीनिष्ठ ज्ञानाला सर्वस्व मानून त्याअनुषंगाने कर्म करण्यात मग्न असायचा. अशा परिस्थितीत त्या लोकांना साक्षर बनविणे, त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्याचबरोबरीने त्यांना वास्तवावर आधारित आणि उपयुक्त शिक्षण घेण्यासाठी प्रेरित करणे, हे देखील बाबांच्या जीवनाचे एक कार्य बनले होते. त्याच अनुषंगाने बाबा कर्मकांडावर आधारित शिक्षणाचा वा संस्काराचा कडाडून विरोध करतात.

एकदा गोदावरी नदीच्या पात्रात पितरांना अर्घ्य देण्याचा प्रकार चालू होता. बाबांनी तो प्रकार पाहिला. कोणालाही काहीही न म्हणता ते नदीत उतरले आणि पाणी हातात घेऊन फेकू लागले. उपस्थितांनी विचारले असता, बाबा म्हणाले, 'तुम्ही इथून स्वर्गातल्या पितरांना अर्घ्य देता, तर मग मीही इथून दापुऱ्याले पाणी पाठवितो. वावरं तरी पिकतीन.'' निश्चितच बाबांचे हे उत्तर धर्मपरंपरेने चालत आलेल्या शिक्षणाची चिकित्सा करायला लावणारे आहे. अशा या धर्मपरंपरेने

चालत आलेल्या शिक्षणात नवस, तीर्थयात्रा इत्यादींनाही महत्त्व दिले जायचे. नवसाला महत्त्व देणाऱ्या लोकांना बाबा, 'नवसे कन्या पुत्र होती! मग का करने लागे पती?' संत तुकाराम महाराजांच्या या ओवीचा दृष्टांत द्यायचे, तर जे लोक तीर्थाला महत्त्व देणारे होते, त्यांना उद्देशून ते म्हणायचे, 'जगन्नाथ, रामेश्वर हे सर्व पोट भरण्याचे देव आहेत.' निश्चितच अशा प्रकारच्या विचाराने बाबांनी तत्कालीन समाजासमोर विज्ञानाधारित शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादित केली.

नीतिशास्त्रीय विचार –

गाडगेबाबांचे नैतिक विचार हे त्यांच्या कार्य आणि विचारातून व्यक्त होतात. नैतिकता ही आपल्या अंतर्मनात विकसित करून ती बाह्य जगतात रुजवायची असते; किंबहुना अंतर्मनात विकसित झालेली नैतिकता ही केवळ विचारापुरतीच मर्यादित ठेवायची नसते. विशेष म्हणजे, ती नैतिकता समाजजीवनात रुजविण्यासाठी आदर्श म्हणून स्वत:चे आचरण लोकांसमोर ठेवायचे असते. याचाच प्रत्यय बाबांच्या कार्य आणि विचारातून ध्वनीत होतो.

व्यापक मानवतावाद –

गाडगेबाबा मानवतावादी विचारसरणीचे होते. त्यांचा मानवतावाद अत्यंत व्यापक स्वरूपाचा आहे. कारण, सामान्य मानवतावाद केवळ मानवाच्या कल्याणाचा विचार करतो; पण बाबांची भूमिका मानवी कल्याणाशिवाय सबंध प्राणिमात्रांच्या कल्याणाची होती. मानवाने मानवाला मानवाप्रमाणे वागविले पाहिजे आणि मानवाने प्रत्येक जीवावर प्रेम केले पाहिजे, हे त्यांचे ब्रीद ठरते. याशिवाय, समाजातील गरीब, उपेक्षित, गरजू, होतकरू लोकांची मुक्तहाताने मदत केली पाहिजे. यासारखे महत्त्व पूर्ण विचार बाबांनी मांडले. याची अनुभूती आपल्याला त्यांच्या पुढील दशसूत्रींमधून येते. 'भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्या व नागड्यांना वस्त्र, गरीब मुला व मुलींना शिक्षणासाठी मदत, बेघरांना आसरा, बेकारांना रोजगार, अंध, पंगू व रोग्यांना औषधोपचार, पशू, पक्षी व मुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरुण व तरुणींचे लग्न, दु:खी व निराशांना हिंमत.'

बाबांनी सांगितलेल्या या दशसूत्रींमधून लक्षात येण्यासारखी बाब ही आहे की, आपल्या समाजामध्ये भूकमारी, बेरोजगारी, गरिबी, दारिद्र्य, नैराश्य यांसारख्या समस्या आहेत आणि अशा या समस्यांना अनुसरून अन्नदान, वस्त्रदान, धर्मशाळांची उभारणी, शिक्षणासाठी मदत, सामूहिक वा मोफत विवाह सोहळे इत्यादी उपक्रम राबविणे ही काळाची गरज बनली आहे; किंबहुना समाजातील एक घटक म्हणून आपली सर्वांची नैतिक जबाबदारी आहे.

कर्मनिष्ठा –

नैतिक दृष्टिकोनातून मानवाने कर्म करणे हे अनिवार्य आहे. कर्मापासून

कोणाचीही सुटका नाही. गीतेतही म्हटले आहे की, काहीही न करण्यापेक्षा काहीतरी केलेले अधिक बरे! एकाअर्थाने कर्म करणे हे मानवाचे कर्तव्यच आहे; पण आपण पाहतो की, आपल्या भारतीय समाजात अनेक लोक कर्म करण्यापासून पळतात. कर्मापासून पळ काढण्यासाठी असे हे लोक निरनिराळे सोंग करतात. वास्तविक पाहता, असे हे लोक आळशी असतात; किंबहुना त्यापैकी काही ध्येयहीन असतात. कर्म करण्यापासून वाचले पाहिजे, अशी एक पक्की मानसिकता या लोकांची झालेली असते. कधी कधी असे हे लोक आपल्या जीवनातील विविध प्रसंगांना अनुसरून दु:खाचे सावट आपल्यावर ओढवून देखील घेतात; पण जे ध्येयवादी असतात, जे आपल्या कर्माप्रति निष्ठा ठेवतात, ते कधीही कर्म करण्यापासून अलिप्त राहत नाहीत.

गाडगेबाबा ध्येयवादी, कर्मनिष्ठ आणि कर्मतत्पर होते. मानवाचा उद्धार हे त्यांचे ध्येय होते. त्यासाठी मानवाला सत्याचे ज्ञान आणि वास्तवाचे भान करून देण्याचे कर्म ते सातत्याने करायचे. म्हणजेच ते कर्मनिष्ठही होते. ते कधीही आपल्या कामात चुकत नसत. ते आपल्या कामाला तत्परतेने महत्त्व देत असत. अगदी मुलांच्या विवाहप्रसंगीसुद्धा नियोजित असलेला आपला कीर्तनाचा कार्यक्रम ते रद्द करीत नसत.

सामान्यत: आपण पाहतो की, कुटुंबातील एखाद्या व्यक्ती मरण पावली की, संपूर्ण घरावर दु:खाचे सावट येते. दु:ख होणे हे जरी स्वाभाविक असले, तरीही त्या दु:खाचा आपल्या उर्वरित आयुष्यात विपरीत परिणाम करून घेणे, आपले जे नित्याचे आणि साध्यरूपी कर्म असतात, त्यापासून विचलित होणे, हे अर्थहीन ठरते. यासंदर्भात बाबांच्या आयुष्यातली एका आणखी एका घटनेचा तपशील देता येईल. एकदा बाबांचा मुलगा गोविंद मरण पावतो, त्यावेळी बाबा रत्नागिरी जिल्ह्यातील खारेपाटण या गावी कीर्तनासाठी गेलेले होते. त्यांना मुलाच्या मृत्यूची वार्ता कळते. तेही थोड्या वेळेसाठी गहिवरतात; पण थोड्या वेळेतच ते कीर्तनासाठी तयार होतात आणि कीर्तनातून म्हणतात –

राम गेले, कृष्ण गेले, पांडवही त्याच वाटीनं गेले ।
ऐसे गेले कोट्यानुकोटी । काय रडू एकासाठी ।।

निश्चितच बाबांचे हे विधान मानवाला आपल्या ध्येयाप्रति, आपल्या कर्तव्याप्रति निष्ठा ठेवण्यासाठी प्रेरित करणारे आहे.

नैतिक दृष्टिकोनातून सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह इत्यादी मूल्यांना अनुसरून सम्यक् वा कुशल कर्माला महत्त्व आहे. वास्तविक पाहता, अशा या मूल्य वा कर्माला अनुसरून बाबांनी प्रत्यक्षपणे फारशी चर्चा केली नाही; पण त्यांच्या जीवन व कार्यातून या मूल्य वा कर्मासंबंधी एक नवीन दृष्टिकोन

येथे मांडता येईल.

अहिंसा –

बाबांची अहिंसेची भूमिका ही जैनांप्रमाणे काया-वाचा-मन याला अनुसरून नव्हती, तर 'जशाच तसे'प्रमाणे होती. मामाच्या शेतावर कैंजा करण्यासाठी आलेल्या सावकार आणि त्याच्या पहिलवानांना बाबांनी चांगलाच चोप दिला होता; पण प्राणिमात्रांविषयी बाबांच्या मनात प्रचंड असा दयाभाव होता. म्हाताऱ्या बैलाला कसायाकडे विकणाऱ्यांना उद्देशून बाबा म्हणायचे, 'तुमचे आई-बाप म्हातारे झाले तर त्यांना बाजारात उभे करता काय?' म्हणजेच बाबांची अहिंसा ही तार्किक स्वरूपाची होती. जे अन्यायी, अत्याचारी, दुष्ट आहेत, त्यांच्याप्रति अहिंसा अनावश्यक असते; पण जे निरपराध, न्यायी, निर्बल आहेत, त्यांच्याप्रति दया दाखविलीच पाहिजे. गुरे-ढोरे, कोंबडे-बकरे हे निरपराध असतात. म्हणून बाबांनी सणवार वा देवाच्या नावाने होणाऱ्या प्रथा-परंपरेत प्राण्यांच्या होणाऱ्या हत्येचा कडाडून विरोध केलेलाच होता.

तत्कालीन समाजामध्ये देवाच्या नावाने बळी प्रथेला अनुसरून बकरे आणि कोंबड्यांची मोठ्या प्रमाणात हत्या केली जायची. बाबा अशा या हत्याऱ्यांना उद्देशून म्हणतात की, 'देवानं कधी कोणाला मागितलं का? अरे जो देतच आला. जो दयाळू म्हणून तुम्ही त्याला मागता, तो त्याचा मोबदला कसा घेईल? देवाला बदनाम करू नका. देवाचे सत्यस्वरूप ओळखून त्याचे भजन करा.' निश्चितपणे बळी प्रथेच्या नावाने पशू-पक्ष्यांची हत्या करणे, हे अविवेकीपणाचे कृत्य आहे. अशा या अविवेकीपणामुळे देवाचे जे वास्तव स्वरूप आहे ते लोप पावते. हेच या ठिकाणी बाबांना सुचवायचे आहे.

अस्तेय –

बाबांचा अस्तेयाचा विचार हा त्यांच्या कार्यातून दिसून येतो. लहानपणीच वडील वारल्याने ते मामाकडे राहण्यासाठी गेले. तिथे जाऊन त्यांनी मामाची शेती केली. मामाच्या अज्ञानातून सावकाराने ती शेती हडपण्याचा प्रयत्न केला असता, तो बाबांनी (डेबूजी) धुडकावून लावला. याने बाबांच्या मनात त्या शेतीवर आपला अधिकार असल्याचा किंवा अधिकार गाजविण्याचा भाव कधीही आला नाही. अर्थात, जी वस्तू आपली नाही, त्यावर अधिकार दाखविणे ही चोरी (स्तेय) आहे, अशी बाबांची धारणा होती.

अपरिग्रह –

बाबांचा अपरिग्रहाचा विचार सुद्धा त्यांच्या कार्यातून दिसून येतो. गृहत्यागानंतर बाबांनी अनेक ठिकाणी घाट, धर्मशाळा बांधल्या. त्यासाठी त्यांना अनेकानी देणग्या दिल्या; पण त्यापैकी एक कवडीसुद्धा बाबांनी स्वत:कडे ठेवली

नाही. इतकेच नव्हे; तर त्यांनी जितक्याही धर्मशाळा बांधल्या, त्यातही त्यांनी कधी निवारा घेतला नाही. निश्चितच पैशांच्या रूपात आणि स्थावर वास्तूच्या रूपातही परिग्रह कसा करायचा नसतो, याचे गाडगेबाबा हे एक जिवंत उदाहरण आहेत.

शौच –

बाबा स्वच्छतेचे पुजारी होते. त्यांनी आपल्या विचार व कार्यातून मन आणि तन स्वच्छ करण्याचे कार्य केले. बाबांचा दगडाच्या देवावर विश्वास नव्हता. ते मंदिरातही कधी जात नसत; पण मंदिराच्या परिसरात भरणाऱ्या जत्रेत मात्र ते आर्वजून जात असत. जत्रेत आलेल्या लोकांकडून परिसर अस्वच्छ होणार नाही, लोक आजारी पडणार नाहीत, परिसरात रोगराई होणार नाही, याची ते काळजी घेत असत. याचाच एक भाग म्हणजे यात्रेत आलेल्या लोकांना आंघोळ इत्यादींची सोय करून देणे, स्वत: हातात खराटा घेऊन परिसर स्वच्छ करणे इत्यादी कामे बाबा करीत असत. विशेष म्हणजे त्याच जत्रेत रात्री बाबा आपल्या कीर्तनातून अंधभक्ती, बहुदेव उपासना, नवस, हवन, बळी, निरक्षरता, कर्ज, व्यसन इत्यादी विषयांचा समाचार घेत उपस्थितांच्या मनातली घाणही स्वच्छ करायचे.

वैश्विक विचार –

साधारणपणे मनुष्य सणवार, लग्न-समारंभ, पाहुणचार, व्यसन, नवस फेड, श्राद्ध-कर्म याशिवाय अज्ञानातून कर्ज पद्धतीला बळी पडतो; पण हीच कर्ज पद्धती मानवाला कशाप्रकारे अधोगतीकडे नेते, हे बाबांना चांगल्या प्रकारे माहीत होते. म्हणून बाबांची भूमिका होती की, 'माणसाने सणवार, लग्न-समारंभ किंवा पाहुणचार या सर्व बाबी आपल्या ऐपतीप्रमाणे केल्या पाहिजेत. जेणेकरून कर्ज काढण्याची आवश्यकता पडणार नाही. याशिवाय, माणसाने आपले व्यसन पूर्ण करण्यासाठी तर मुळीच कर्ज काढू नये.'

तत्कालीन समाजामध्ये नवस बोलण्याची व ती फेडण्याची पद्धत रूढ होती. नवस फेडण्यासाठी कित्येक लोक कर्जबाजारी व्हायचे. बाबांची शिकवण होती की, 'खोट्या देवाचे नवस फेडणे संपले की खर्च टळेल. त्यातून बचत होईल आणि परत कर्ज काढण्याची वेळ येणार नाही.' निश्चितच बाबांची ही भूमिका अगदी व्यावहारिक स्वरूपाची आहे. याशिवाय, बाबांचे हे विचार म्हणजे माणसाने मानसिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचे आवाहन करणारे आहे. निश्चितच बाबांचा हा विचार प्रत्येक युगासाठी आणि प्रत्येक देशासाठी मार्गदर्शक आहे.

समारोप –

अशा प्रकारे गाडगेबाबांनी मानवी कल्याणाच्या अनुषंगाने आवश्यक आणि अनावश्यक असलेल्या बाबींवर प्रकाश टाकत, त्याची चिकित्सा करीत व्यावहारिक, वैज्ञानिक, कर्मवादी भूमिका मांडली. मानवाचा विकास हा केवळ

स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या तत्त्वांचे ज्ञान प्राप्त करून होत नाही, तर तो या तत्त्वानुसार वागल्याने होतो; पण त्यासाठी अडसर ठरणाऱ्या घटकांना विरोध करणे, त्यांना बाजूला सारणे सुद्धा तेवढेच आवश्यक असते आणि याचाच प्रत्यय बाबांच्या विचार व कार्यातून येतो. अर्थात, बाबांनी, ''मानवतेला महत्त्व देताना दगडातला देव नाकारला. गोरगरिबांना अन्नदान करण्यासंबंधीचा विचार मांडताना नवस प्रथेचा विरोध केला. जिवांच्या अहिंसेचा विचार मांडताना बळी प्रथेचा विरोध केला. शिक्षणासंबंधीचा विचार मांडताना निरक्षरतेचा दुष्परिणाम मांडला. कुटुंबाचा व स्वतत:चा विकास साधण्याचे आवाहन करीत असताना कर्ज व व्यसनाचा धिक्कार केला. वैज्ञानिक व व्यावहारिक विचार मांडताना पोथी-पुराणातील सूचनांची चिकित्सा केली.'' निश्चितच बाबांचे हे विचार व कार्य सामान्यातल्या सामान्यालाही जीवनाचे ध्येय शोधण्यासाठी आणि त्या ध्येयाचा मार्ग कसा असावा, याचा विचार करण्यासाठी प्रेरणा देणारे आहे.

संदर्भ

१. संत गाडगे महाराज काल आणि कर्तृत्व, प्रा. सत्यवान मेश्राम, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.
२. श्री संत गाडगेबाबा, प्रबोधनकार के. सी. ठाकरे.
३. श्री संत गाडगे महाराज, मधुकर केचे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
४. संत गाडगेमहाराज यांचे शेवटचे कीर्तन, संपा. गंगाधर बनबरे, जिजाई प्रकाशन, जिजापूर, पुणे.
५. गरिबांचे कैवारी गाडगेबाबा, डॉ. भगवान अंजनीकर, निर्मल प्रकाशन, नांदेड.

डॉ. सुनिलदत्त सोपान गवरे

तत्त्वज्ञान विभाग प्रमुख -
शिवळे महाविद्यालय, शिवळे
भ्रमणध्वनी क्र. : ८२०८७०४६८७, ९१५२०२०४५३

▸ अभ्यास मंडळ :

1. Board of studies in Philosophy : University of Mumbai. 2016-2019
2. Board of studies in Philosophy : University of Kolhapur. 2017 to Til today
3. Board of studies in Philosophy : University of Solapur. 2020 to Til today
4. Board of studies in Philosophy : Atonoms College, SJM College, Karad. 2017 to Til today
5. Board of studies in Philosophy : Atonoms College, TC College, Baramati. 2020 to Til today

- ASIA - ARAB SUMMIT & AWARDS - 2019 BEST TEACHER AWARD.
- THANE - PALGHAR JILHA GRAMIN AWARDS - 2021 BEST TEACHER AWARD.
- DISTRICT LEVEL BEST PROGRAMME OFFICER - 2007-08
- UNIVERSITY LEVEL BEST AREA - COORDINATOR - 2008-09
- VICE PRESIDENT OF MAHARASHTRA PHILOSOPHY CONFERENCE. 2009 to 2016.
- CHIEF EXECUTIVE OF MAHARASHTRA PHILOSOPHY CONFERENCE. 2016 to 2020.
- PRESIDENT OF MAHARASHTRA PHILOSOPHY CONFERENCE. 2021 to Til today
- K.B.C. N.M.U., JALGAON - PRATAP PHILOSOPHY CENTER - COMMITTEE MEMBERS 2021.
- K.B.C. N.M.U., JALGAON - PRATAP PHILOSOPHY CENTER - AUDITOR COMMITTEE MEMBERS 201
- PRIN. SHIVAJIRAO BHOSALE VICHAR MANCH - FOUNDING PRESIDENT.

▸ प्रकाशित पुस्तके :

- भारतीय नास्तिक दर्शनांचे नीतिशास्त्र
- पाश्चात्य विचारवंतांचा सुखवादी विचार
- पाश्चात्य विचारवंतांचा ईश्वर विचार
- महाराष्ट्र गवरे परिवार

आता ई-बुक स्वरूपातही अथर्ववी सर्व पुस्तके उपलब्ध...

- pejbook.com
- amazon.com
- Google Play Books
- atharvapublications.com

अथर्व पब्लिकेशन्स्

ऑनलाईन पुस्तक खरेदीकरिता...

www.atharvapublications.com